दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार २५ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २५२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# केज शहरातील तरुणाच्या खुनप्रकरणातील आरोपीचा दोन तासात शोध घेवुन केले अटक

## आरोपीला २९ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी




## केज पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी यांची कर्तव्यदक्षपणे कारवाई

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकुर साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके मॅडम, मा. सहायक पोलीस अधीक्षक श्री कमलेश मीना साहेब मार्गदर्शना खाली मा. पोलीस निरिक्षक महाजन साहेब, पोलीस उप निरीक्षक पाटील साहेब, शिंदे साहेब, सारंग साहेब पोलीस अमलदार पोह/३९ बांगर,पोह/१७४२ चौधरी, पोह/१६३२ अहंकारे, पोह/१६७३ अहंकारे, पोह/१०५१ वंजारे, चापोह /८५८ दराडे, मपोह/९१ पाचपिंडे, पोना/१३८४ चोपणे, पोशि/१६२४ शेख, पोशि/४७१ गिते, पोशि/७४ कागदे यांनी केलेली आहे.

**वादळवार्ता/केज**

केज शहरातील क्रांतीनगर येथील तरुणाच्या खून प्रकरणी केज पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष अधिकारी कर्मचारी यांनी तात्काळ कारवाई करत आरोपीस अटक केली त्यास न्यायालयात हजर केले असता त्यास २९ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली . याबाबत सविस्तर वृत्त असे की दिनांक २३/०४/२०२४ रोजी फिर्यादी नामे राज संजय गायकवाड वय २३ वर्षे व्यवसाय मजुरी रा. क्रांतीनगर केज जि बीड यांनी तक्रार पोलीस ठाणे केज येथे तक्रार दिली की, त्यांचा मामे भाऊ गोरख महावीर हजारे वय १८ वर्षे रा. क्रांतीनगर केज यांनी त्यांना फोन करुन सांगितले की, मी क्रांतीनगर केज येथील समाजमंदिर जवळ असुन मला आपले गल्लीत राहणारा सनी शामराव लांडगे याने विनाकारण मारहाण केलेली आहे परत तो मला मारणार आहे तु कोठे आहेस लवकर माझ्याकडे ये, असे फोनवर सांगितल्याने फिर्यादी हा तात्काळ समाजमंदिर जवळ गेला. समाजमंदिर येथे सनी लांडगे व माझा मामे भाऊ गोरख महावीर हजारे हा तेथे उभे होते. गल्लीतील इतर लोक जमा झाले होते फिर्यादीला त्याचा मामे भाऊ हा बोलत असताना अचानक सनी शामराव लांडगे याने काहीतरी लोखंडी शस्त्र (हत्यार) शर्टात आत ठेवलेले बाहरे काढुन गोरख याचे मानेजवळ हत्यार खुपसले त्यामळु गोरख हा रक्तबंभाळ होवुन खाली पडला तेव्हा सनी लांडगे हा तेथुन पळुन गेला. त्यानंतर जखमी गोरख हजारे यास मी व दिपक काळे यांनी गोरख ला उपचारकामी सरकारी दवाखाना केज येथे नेले असता, तेथील डॉक्टरांनी गोरख महावीर हजारे यास तपासुन तो मयत झाल्याचे सांगितले. वगैरे मजकुराच्या फिर्याद वर पोलीस ठाणे केज येथे गुरनं २२८/२०२५ कलम ३०२ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केज पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी यांनी कर्तव्यदक्षता दाखवत बजावली मोलाची कामगिरी सदर घटनेबाबत ची माहीती पोलीस ठाणे केज येथील पोलीस निरीक्षक श्री प्रशांत महाजन यांना मिळाल्याने त्यांनी लगेच पोलीस ठाणे केज येथील पोलीस उप निरीक्षक श्री आनंद शिंदे, श्री राजेश पाटील, श्री वैभव सारंग व पोलीसअमलदार पोह/३९ बांगर, पोह/१७४२ चौधरी, पोह/ १६३२ अहंकारे, पोह/१६७३ अहंकारे, पोह/१०५१ वंजारे, चापोह / ८५८ दराडे, मपोह/९१ पाचपिंडे, पोना/१३८४, पोशि/१६२४ शेख, पोशि/४७१ गिते, पोशि/७४ कागदे, असे तात्काळ क्रांतीनगर व सरकारी दवाखाना केज येथे जावुन घटनेचे गांभीर्य पाहुन पोनि श्री प्रशांत महाजन यांनी घटनेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकुर साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके मॅडम, मा. सहायक पोलीस अधीक्षक श्री कमलेश मीना साहेब यांना घटनेची माहीती देवुन घटनेची माहीती दिली व वरीष्ठांचे सुचनेप्रमाणे केज शहरात बंदोबस्त लावुन आरोपीचा शोध घेणेकामी पोलीस उप निरीक्षक श्री आनंद शिंदे, पोह/३९ बांगर, पोह/१७४२ चौधरी, पोशि/४७१ गित्ते, पोशि/७४ कागदे, यांनी आरोपीचा तांत्रीक यंत्रणेचा व कौशल्यचा वापर करुन आरोपी नामे सनी शामराव लांडगे हा पळुन जाण्याच्या तयारीत असताना मौजे बोबडेवाडी ता. केज शिवारात असले बाबत माहीती मिळाल्याने मौजे बोबडेवाडी येथे जावुन शेतात लपुन बसलेला सनी शामराव लांडगे यास गुन्हा घडल्यापासुन दोन तासामध्ये शिताफीने ताब्यात घेवुन पोलीस ठाणे केज येथे आनले. गुन्हयातील आरोपी सनी शामराव लांडगे रा. क्रांतीनगर केज याने मयत गोरख महावीर हजारे वय १८ वर्षे रा. क्रांतीनगर केज यास किरकोळ भांडणाचे कारणावरुन धारदार लोखंडी हत्यार त्याचे मानेजवळ खुपसुन जिवे ठार मारले आहे. सदर गुन्हयाचा तपास मा पोनि सो यांचे आदेशाने पोलीस उप निरीक्षक राजेश पाटील हे करत आहेत. सदर अटक आरोपीस आज दिनांक २४/०४/२०२४ रोजी मा न्यायालयामध्ये रिमांडकरीता हजर केले असता मा न्यायालयाने अटक आरोपीस दिनांक २९/०४/२०२४ रोजी पर्यत पोलीस कोठडीचे आदेश दिले आहेत.

# भडंगवाडी ग्रामस्थांनी ओडल्या बजरंग सोनवणे यांच्या विजयासाठी १२ गाड्या

**वादळवार्ता/ गेवराई**

गेवराई तालुक्यातील मौजे भडंगवाडी येथे दरवर्षी हनुमान जन्मोत्सवा निमित्ताने हनुमान मंदिर ते महालक्ष्मी मंदिरा पर्यंत १२ गाड्या ओढण्याची परंपरा आहे . या निमित्ताने हनुमान मंदिर ते महालक्ष्मी मंदिरा पर्यंत गाड्या ओडून नवस बोलले जातात त्या नुसार आज मौजे भडंगवाडी येथे गाड्या ओढण्यात आल्या त्यावेळी मौजे भडंगवाडी ग्रामस्थाकडून शेतकरीपुत्र तथा महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे विजयी व्हावे म्हणून नवस बोलून गाड्या ओडण्यात आल्या त्या वेळी मोठ्या संख्येने ग्रामस्था सह भाविक भक्त उपस्थित होते.



# प्रताप पाटील चिखलीकर यांची नायगाव शहरात दोन ठिकाणी कॉर्नर सभा व गाठीभेटी

**वादळवार्ता/नायगाव**

प्रचाराचा आजचा दिवस हा शेवटचा दिवस असून नायगाव शहरासह परिसरातील लोकांसाठी भाजपा उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांची नायगाव शहरातील हनुमान राजुरा मंदिर येथे भाजपा शहराध्यक्ष माधव पाटील कल्याण व बालाजी बच्चेवार यांच्या घरी कॉर्नर सभा घेण्यात आली. शहरातील अनेक मतदार बांधव दुकानदार व्यापारी यांना गाठीभेटी घेऊन भाजप पक्षाला मतदान करण्याचे खा .चिखलीकर पाटील यांनी नम्र आवाहन केले आहे. कॉर्नर सभा व गाठीभेटीसाठी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या सह आमदार राम पाटील रातोळीकर मारोतराव कवळे गुरुजी ,राजेश कुटूरकर बालाजी बचेवार शिवराज पाटील वडाळकर श्रावण पाटील भिलवंडे लक्ष्मण ठाकरवाडी माधव देवसरकर माणिकराव लोहगावे मनोहर पवार किशनराव कुदळेकर अशोक पाटील मोगावकर गजानन पाटील चव्हाण डॉक्टर मीनाक्षी काकडे सोनाली हंबर्डे दिपाली जाधव शिवाजी पाटील ढगे सावरखेडकर माजी सरपंच हिप्परगा येथील माधवराव पाटील गंगाधर गायकवाड धनराज शिरोळे आनंदराव बावणे गणेश पाटील होटळकर यांची यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

# जोतिबा यात्रेसाठी येणा-या भाविकांना अनंतशांती मार्फत सरबत वाटप दरवर्षी होतेय उपक्रमाचे कौतुक

**वादळवार्ता/कुडूत्री**

अनंतशाती सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने दरवर्षी भाविकांना सरबत वाटप करण्यात येते. प्रतिवर्षी प्रमाणे वाडी रत्नागिरी श्री क्षेत्र जोतिबा येथे संपुर्ण महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडू व आदी राज्यातील लाखो भाविक येत असतात.

मानाच्या सासकाठी सह शेकडो सासन काठ्या जोतिबा डोंगरावर भक्ती भावाने चैत्र यात्रेला गुलालाची उधळण करतात.याच लाखो भाविकांचे श्रद्धास्थान श्री श्रेत्र जोतिबा साठी एस. टी. महामंडळाच्या वतीने अनेक जादा एस ।टी चे नियोजन केले जाते. प्रवासाचा वाढता कल व रखरखत्या उन्हाचा तडाखा यांचा आढावा घेऊन अनंतशांती बहुउद्देशीय सामाजिक सेवा संस्थे मार्फत भाविकांना सरबत वितरणाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन संस्थापक भगवान गुरव,, अध्यक्ष माधुरी खोत सचिव अरूणा पाटील संचालक मनोज माने सागर गुरव विजय शिंदे यांनी केले या कार्यक्रमाचे उद्घाटन आगार व्यवस्थापक माननीय म्हेतर साहेब यांनी केले. तर ए टी एस विभुते साहेब ए डब्ल्यू एस संकेत जोशी साहेब.टी आय सारंग, जाधव साहेब, जानकर साहेब यांच्या उपस्थितीत सरबत वितरण झाले यावेळी सुभाष चौगले,संकपाळ अरूण पाटील अश्विनी ढमाले निता मोरे,तसेच इतर अधिकारी व महिला कर्मचारी वर्.व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते



संपादकीय

## संस्कृती संवर्धन

आपल्या कुटुंबाचा सर्वांगीण विकास होऊन आपली मुले,नातवंडे सुसंस्कारक्षम,आदर्श सुखी व राष्ट्रभक्त व्हावेत म्हणून वर्षाचे सर्व उत्सव, परंपरा,राष्ट्रीय सण विश्वातील सर्व धर्म व पूजा, प्रार्थना यांचा मिलाफ आपण साधत असतो. आपल्या उत्सवांच्या वेळेस ज्या परंपरा आपण पाळतो, निभावतो त्यातून आपली संस्कृती संवर्धन होत असते. सुसंस्कार,सदविचार,सुसंवाद,समृद्धी व समाधान मिळत असते.भारतात, सणाची प्रतीक्षा सर्व वयोगटातील लोक म्हणजेच मुले, तरुण आणि कुटुंबातील सर्वच वडिलधारे करतात. भारतातील प्रत्येक व्यक्ती भारतीय उत्सव खूप उत्साहाने आणि आनंदाने साजरे करतात. दिवाळी, होळी, रक्षाबंधन, गणेश चतुर्थी, दुर्गा पूजा, दसरा, स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन हे काही महत्त्वाचे धार्मिक आणि राष्ट्रीय सण आहेत.

भारतीय सण हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहेत. एकीकडे दसरा अन्याय केल्याबद्दल न्यायाची घोषणा करतो तर दुसरीकडे दिवाळी असे सांगते की आम्ही अंधकाराचे नव्हे तर प्रकाशाचे पुजारी आहोत. होळी हा नृत्य आणि संगीत, रंग यांचा सण आहे. रक्षाबंधन भावंडांमधील निःस्वार्थ आणि पवित्र प्रेम यांचा गौरव करतो. मकरसंक्रांतीद्वारे सूर्याचे स्वागत केले जाते. महाशिवरात्री, श्रीराम नवमी, गणेश चतुर्थी इत्यादी उत्सवातही आपली संस्कृती तिच्या भव्य आणि वेगवेगळ्या रूपात प्रतिबिंबित होते.

आपले सण आनंद आणि करमणुकीचे साधन आहेत. लोकांना उत्सवांमधून ताजेपणा, आनंद आणि प्रेरणा मिळते. धार्मिक सणांनी मन प्रसन्न आणि निर्मळ होऊन जाते. सण जातीयता आणि प्रांतीयतेच्या भिंती पाडून टाकतात. ते आपल्या हृदयात सहकार्य आणि बंधुत्व निर्माण करतात. यातून आपल्याला अन्याय आणि अत्याचारांवर लढा देऊन देशात न्याय आणि शांतता प्रस्थापित करण्याची प्रेरणा मिळते, त्याग आणि तपश्चर्येद्वारे आयुष्य आनंदी करण्याचा सुवर्ण संदेश मिळतो.

दु:खाची बाब म्हणजे आजकाल काही लोक सणांचे पावित्र्य विसरून, जुगार खेळतात, मद्यपान करतात आणि गैरवर्तन करतात. ते पैसे वाया घालवतात आणि कधीकधी छोट्या छोट्या गोष्टीवर हाथापाई करतात. कोणत्याही परिस्थितीत उत्सवाचा आनंद विलासितेचे पोषक होऊ नये. सण हे आपल्या आयुष्याचे महत्वाचे भाग आहेत, म्हणून आपण सणांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि त्यांच्याशी संबंधित आपण निर्माण केलेल्या वाईट गोष्टींचा त्याग केला पाहिजे.

सौ जयश्री पंकज बोरसे,कल्याण

# अर्धवट उपचार: पुढे धोक्याचा सुमार!

**(विश्व मलेरिया डे सप्ताह विशेष.)**

धक्कादायक असे की, मलेरिया- हिवताप आजाराच्या उच्चाटनासाठी २५ एप्रिल या दिवशी भलेही जागतिक मलेरिया दिन साजरा होतो. मात्र वास्तव असे की, जगभरात प्रत्येक दोन मिनिटांना एका बाळाचा अथवा लहान मुलाचा मृत्यू केवळ मलेरियाने होतो. ही जागतिक पातळीवरील सरासरी आहे. मलेरिया हा डासांच्या चावण्यामुळे होणारा रोग आहे. डासांद्वारे त्याचा प्रसार होतो. याचा प्रादुर्भाव विषुववृत्तीय भागांत जास्त आहे. आपण डॉक्टर नाही, तरी सतर्कतेसाठी हे ठावे असावे. मलेरियाचे गांभीर्य लक्षात घेता जागतिक मलेरिया दिन पाळण्याची निकड भासू लागली. अधिक माहितीसाठी वाचा हा श्री एन. के. कुमार गुरूजी यांचा लेख... संपादक.

मलेरियाला समूळ संपवण्यासाठी डब्ल्यूएचओ व आरबीएम एकत्र आले आहेत. त्याच्या समूळ उच्चाटनासाठी राजकीय, सामाजिक पातळीवर एकत्र येणे, विशिष्ट अजेंडा तयार करणे अशी त्यांची संकल्पना आहे. प्रोटोजुअन प्लाज्मोडियम नावाच्या कीटाणूच्या एनोफिलीज मादी डासापासून मलेरिया होतो. आजवर या आजाराने जगभरात अनेकांचे बळी घेतले आहेत. या आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न सुरु असतानाच अवघे जग आज कोरोना व्हायरस अर्थातच कोव्हिड-१९ या विषाणूचा सामना करत आहे. जागतिक आरोग्य संघटना डब्ल्यूएचओने या विषाणूचे वर्णन साथिचा आजार असे केले आहे. दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेने मलेरिया आणि इतर साथींच्या आजारांचा अनुभव लक्षात घेता जगभरातील देशांनी कोरोनाचे संकट लवकरात लवकर कसे निपटता येईल, यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलावीत. महत्त्वाचे असे, की आज जागतिक मलेरिया दिन आहे. प्लाझमोडियम या जातीच्या डासांमुळे होणारा हा रोग तसा फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकात हिपोक्रॅटिस यांना मलेरिया सदृश्य आजार माहीत होता. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात जैलुइट लोकांनी पेरू देशात सिंकोना ही वनस्पती आणली होती. या सुमारास जेव्हा युरोपमध्ये फार मोठ्या प्रमाणात मलेरियाची साथ आली. तेव्हा या सिंकोना वनस्पतीचा त्या तापावर उपचार करण्यात आला होता. या उपचारांमुळे मलेरिया आणि अन्य प्रकारचे ताप यांतील फरक सिडनर्हेम आणि अन्य वैद्यांना ओळखणे शक्य झाले. इ.स. १८८०मध्ये लेव्हेरान यांनी मलेरिया निर्माण करणाऱ्या डासांचा शोध लावला, परंतु या डासांचे प्रामुख्याने जे तीन प्रकार आहेत, त्याचा शोध त्यावेळी लागला नव्हता.

जागतिक मलेरिया दिन हा २५ एप्रिल रोजी जगभर साजरा केला जातो. इ.स.२००८मध्ये अफ्रिकेत हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. मलेरिया या साथीच्या आजाराने आजवर जगभरात अनेकांचा बळी घेतला आहे. त्यामुळे अवघ्या जगाने एकत्र येत मलेरिया आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जागतिक मलेरिया दिन साजरा केला जातो. सन २००७ या वर्षाच्या मे महिन्यात भरलेल्या साठव्या जागतिक आरोग्य परिषदेत हा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. या परिषदेला उपस्थित असलेल्या ४४ देशांनी एकमुखाने ही घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या आकडेवारीनुसार सन २००० ते २००४ या कालावधीत मलेरियामुळे होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात मोठी घट झालेली दिसते. या काळात मृत्यूदर सुमारे ४० टक्क्यांनी घसरला आहे. ही आनंदाची बाब आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा २०१९चा अहवाल सांगतो, की सन २०१४ ते २०१८या काळात मात्र मलेरियाचा प्रादुर्भाव कमी करण्यात जागतिक पातळीवर विशेष यश आले नाही. साधारण सन २०१७मध्ये मलेरियाने जेवढे मृत्यू झाले तेवढेच २०१८मध्येही झाले. त्यामुळे मलेरिया उच्चाटनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. हा डास मलेरियाचा वाहक आहे. या डासांचे नियंत्रण हा मलेरिया रोखण्याचा परिणामकारक उपाय आहे. इ.स.१८९४ साली रॉस यांनी या संदर्भात पुढील संशोधन करण्याचे ठरविले. त्यांनी, ज्या रोग्यांना मलेरिया झाला आहे. त्यांना चावा घेण्यास डासांना उद्युक्त केले. या मलेरिया ग्रस्त रोग्यांना डास चावल्यावर, त्या डासांच्या शरीरात मलेरियाच्या जंतूंचे काय होते? कोणकोणते आणि कसे बदल होतात? याचा अभ्यास सुरू केला; परंतु पहिली दोन वर्षे त्यांत फारशी प्रगती झाली नाही, तरीही नाउमेद न होता त्यांनी अभ्यास चालूच ठेवला होता. इ.स. १८९७मध्ये त्यांच्या प्रयत्नांना यश आले. त्यांना दिसून आले की, डासांच्या जठरामध्ये बटणाच्या आकाराच्या जंतूंची अनेक अंडी तयार होतात. ही अंडी त्या डासांच्या लाळेत येतात आणि असे डास जेव्हा माणसांना चावतात तेव्हा त्या माणसांमध्ये पुरेशी प्रतिकारशक्ति नसेल त्यांना मलेरिया होतो. हे त्यांचे संशोधन बहुमोलाचेच होते.

इ.स.१८९४मध्ये मॅनसन यांनी असे गृहीतक मांडले, की मलेरिया हा रोग डासांमुळे होत असून तो या जंतूंनी युक्त डास चावा घेऊनच नव्हे, तर पाण्यावाटे पसरवीत असावेत. पुढे इ.स. १८९८मध्ये रॉस यांनी मलेरिया डासांमुळे नेमका कसा होतो, याचा शोध लावला. पक्ष्यांमधील मलेरिया प्रमाणेच मानवी शरीरांतही घडामोडी होत असल्या पाहिजेत, असे त्यांना दिसून आले. त्याच वर्षी ग्रासी, बिगनमी आणि बास्टिनेली यांनी ॲनोफेलिस जातीच्या डांसामध्ये प्लाझमोडियम, फाल्सिपॅरम या जातीच्या मलेरियाच्या जंतूंची कशी वाढ होते आणि पुढे ते संसर्गित डास चावल्यामुळे माणसांमध्ये मलेरिया कसा होतो, हे दाखवून दिले. मलेरिया तापात थंडी वाजून ताप येणे आणि पुन्हा तीन चार दिवसांनी ताप येण्यामुळे शरीरात हिमोझाईन हा विषारी पदार्थ दिसून येतो. यामध्ये दोन प्रमुख- १) मलेरियाचे जंतू आणि त्यांचे वातावरण आणि २) ॲनॉफिलस जातीचे डास आणि त्यांचे वातावरण या घटकांचा विचार केला पाहिजे.

**श्री एन. के. कुमार, गुरूजी.**
**(मराठी साहित्यिक विदर्भ**

# बेरोजगारांसाठी येडेश्वरी सारखे आणखी युनिट उभे करू, त्यासाठी बजरंग बाप्पांना संसदेत पाठवा - सौरव सोनवणे

## बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ केज तालुक्यात कॉर्नर बैठका

**वादळवार्ता/केज**

सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम उपलब्ध करून देण्यासाठी येडेश्वरी साखर कारखान्यासारखे इतर युनिट उभे करू. बेरोजगारांना स्वतःच्या पायावर उभे करू. त्यासाठी शेतकरी पुत्र बजरंग बाप्पा सोनवणे यांना मतदानरूपी आशीर्वाद देऊन संसदेत पाठवा. आवाहन युवानेते सौरव बजरंग सोनवणे यांनी केले. आम्ही आपले कधी ही विसरणार नाहीत अशी ग्वाही ही त्यांनी दिली.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ केज तालुक्यातील लव्हुरी, कोल्हेवाडी, तरनळी, साबला, धर्माळा या गावात कॉर्नर बैठका घेण्यात आल्या. यावेळी युवानेते सौरव सोनवणे हे बोलत होते. यावेळी शेकापचे भाई मोहन गुंड, मुन्ना चाळक, पिंटु मस्के, बप्पा डोंगरे बालाजी सोनवणे यांच्यासह तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी भाई मोहन गुंड म्हणाले की, या निवडणुकीत सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी वर्गामध्ये भाजपविरोधी खूप मोठा रोष निर्माण झाला आहे. गेल्या दहा वर्षापासून फक्त भांडवलदार पोसण्याचे काम या भाजपकडून होताना



दिसत आहे. मात्र सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी वर्गाला वेठीस धरले आहे. पीकविमा, अतिवृष्टी अनुदान, फळबागाचे नुकसान अशा अनेक प्रश्नावर भाजप उदासीन आहे. बीड जिल्ह्यात सर्वाधिक आत्महत्या झाल्या असून बीडच्या खासदाराने दहा वर्षात चक्र शब्द काढला नाही. असा आरोप करीत इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांची निवडणूक सर्वसामान्य माणसाने हाती घेतली असून त्यांचा विजय कोणी रोखू शकत नाही. असा विश्वास भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केला.

# पिंपळवंडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**वादळवार्ता/पिंपळवंडी**

आकर्षक रथातून डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक संपन्न

पिंपळवंडी दि.२४(प्रतिनिधी)



पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे प्रतिवर्षाप्रमाणे दि.२३/०४/२०२४ मंगळवार रोजी विश्वरत्न,भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सार्वजनिक १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती महादेवानंद भारती महाराज तर प्रमुख पाहुणे निलेश मोरे,गोविंद गाडे,कॅप्टन राजाभाऊ आठवले,अमरसिंह ढाका,ॲड. सतीश शिंदे,सुरज काळूखे, राजाराम जाधव,दादासाहेब पवार आदी होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे शुभहस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे,लहुजी साळवे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येऊन दिप प्रज्वलन केले.याप्रसंगी महंत महादेवानंद भारती महाराज,राजाभाऊ आठवले,अमरसिंह ढाका,ॲड. सतीश शिंदे, कु.कोमल गाडे यांनी भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याची व सामाजिक कार्याची सविस्तर ओळख करून देऊन त्यांचे विचार व आदर्श घेण्याचे मार्गदर्शन केले.यावेळी सर्वांनी भाषणातून धम्म म्हणजे नीती,नीती म्हणजे माणसाने माणसासम कशा प्रकारे वागायचे त्यास नियतीचा धम्म असे म्हणतात.पाच पंचशील हे जीवन जगण्याचा मार्ग आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे कार्य समाजातील प्रत्येकासाठी प्रत्येक जाती धर्मासाठी अलौकिक होते.प्रत्येकानी त्यांचे विचार आत्मसात करावेत.शिक्षणामुळे माणूस सज्ञान होऊन समाजाची प्रगती होते. आजच्या काळात शिक्षणामुळेच नवक्रांती घडू शकते. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ३२ पदव्या घेऊन सिद्ध केले आहे.सर्वांनी संतांचे विचार आचरणात आणून रामायण व कुराण प्रमाणे संविधान वाचले पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये टिकायचे असेल तर डॉ.आंबेडकरांचे विचार अमलात आणून त्यांचा आदर्श घेतला पाहिजे.छत्रपती शिवराय,आरक्षणाचे जनक शाहू महाराज, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी समाजाला दिशा देण्याचे कार्य केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आदर्श घटनेची निर्मिती करून महान कार्य केलेले आहे,हे सर्वांनी भाषणातून सांगितले.यानिमित्त सायंकाळी ५ नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य आकर्षक रथातून डिजेसह तोफा फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य-दिव्य मिरवणूक संपन्न झाली. या कार्यक्रमाला व मिरवणुकीत आजी-माजी सरपंच,उपसरपंच,ग्रा. पं.सदस्य चेअरमन, पत्रकार सर्व स्तरातील नागरिक,ग्रामस्थ, समाज बांधव व महिला युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.जयंती उत्सव यशस्वीतेसाठी राजू मोरे,दिपक गाडे,विजय मोरे,संजय गाडे,संजय मोरे,प्रकाश मोरे, उमेश गाडे,अंबादास मोरे,जालिंदर गाडे,प्रकाश गाडे, आजिनाथ गाडे,बाळू गाडे,रवी मोरे, गणेश गाडे,युवराज गाडे,आकाश मोरे, अनिकेत मोरे,शंतनु मोरे,अशोक गाडे, शंकर गाडे आदींनी बहुमूल्य परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश पवार सर यांनी केले.

## अंबाजोगाई बसस्थानकात महिलेच्या पर्समधील पावणेदोन लाखांचे दागिने चोरट्यांनी लांबविले

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

नातेवाईकाचे लग्न लावून लातूरला जाण्यासाठी निघालेल्या महिला बालविकास कार्यालयातील महिलेच्या पर्समधील पावणेदोन लाखांचे दागिने अंबाजोगाई बसस्थानकात चोरट्यांनी लंपास केले असल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लातूर येथील महिला बालविकास कार्यालयात कार्यरत असलेल्या सीमा सुग्रीव इंगळे ,रा. खोरे गल्ली, लातूर या नातेवाईकाच्या लग्नासाठी अंबाजोगाई तालुक्यातील पूस येथे आल्या होत्या. लग्न आटोपून लातूरला परत जाण्यासाठी त्या सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास अंबाजोगाई बसस्थानकात आल्या. तिथे तोंडाला स्कार्फ बांधलेल्या एका महिलेने त्यांच्याजवळ येत तुमच्या गळ्यातील सोने बॅगेत ठेवा, बसस्थानकावर खूप गर्दी आहे असे सांगितले. त्यामुळे सीमा इंगळे यांनी त्यांच्याजवळील सोन्याचे गंठन, नथ, अंगठी, मणीमंगळसूत्र आणि चांदीची चैन असे एकूण पावणेदोन लाख रुपये किमतीचे सहा तोळे सोन्याचे दागिने स्वतःजवळील बॅगेतील डब्यात ठेवले. त्यानंतर लातूरला जाणाऱ्या बसमध्ये चढताना ती महिला त्यांच्या समोरच होती, दुसरी एक स्कार्फ बांधलेली महिला मागे थांबून त्यांना अडथळा निर्माण करत होती. बसमध्ये चढून सीटवर बसल्यानंतर सीमा यांनी बॅग तपासली असता दागिने चोरी गेल्याचे आढळून आले. बसस्थानकावरील सीसीटीव्ही तपासला असता पाठीमागे असणाऱ्या महिलेनेच चोरी करून पळ काढल्याचे दिसून आले. याप्रकरणी सीमा इंगळे यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई पोलिस ठाण्यात अनोळखी महिलेविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## आज तांदळवाडी येथे ह भ प संजय महाराज पाचपौर यांचे किर्तन

**वादळवार्ता/शिरूर कासार**

प्रातःस्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभ केलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचा फिरता नारळी सप्ताहाचे हे ९२ वर्ष बीड जिल्ह्यातील तांदळवाडी भिल्ल येथे संपन्न होत असून आज दिनांक २५ एप्रिल रोजी रात्री आठ ते दहा विदर्भ रत्न रामायणाचार्य ह भ प संजय महाराज पाचपोर अकोला यांचे जाहीर हरी किर्तन होणार असून या कीर्तनाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन तांदळवाडी भिल्ल जि बीड यांनी केले आहे सकाळी काकडा भजन गाथा गाथा भजन प्रवचन हरिपाठ श्रीमद्



भागवत कथा व रात्री आठ ते दहा जाहीर हरी कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे दुपारी दोन ते पाच अनंत विद्या विभूषित श्री १००८ उत्तम स्वामीजी महाराज यांच्या मुखर्विंधातून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे हरिपाठ होऊन रात्री आठ ते दहा विदर्भ रत्न रामायणाचार्य ह भ प संजय महाराज पाचपोर अकोला यांचे कीर्तन होणार आहे व त्यानंतर जागर होऊन या सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र गहिनीनाथ संस्थांचे मठाधिपती ह भ प गुरुवर्य विठ्ठल महाराज व सर्व ग्रामस्थ तांदळवाडी भिल्ल जिल्हा बीड यांनी केले आहे

# भगवानगडाच्या नारळी सप्ताहात महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी पंगतीला बसून घेतला शिंगोरी आमटीचा आस्वाद

**वादळवार्ता/शिरूर कासार** घोगस पारगांव येथे सध्या श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेला ९० वा सप्ताह मोठ्या थाटात सुरू आहे. या वैभवशाली सप्ताहात ऐश्वर्यसंपन्न भगवानगडाचे महंत ह भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी सप्ताहातील भोजन मंडपात अगदी पंगतीला बसून साध्या पत्रावळीवर शिंगोरी आमटी व भाकरीचे जेवण करून श्री संत भगवानबाबांच्या आठवणीला उजाळा देत असल्याचे एक विलोभणीय दर्शन भाविकांनी प्रत्यक्ष अनुभवले. यावेळी भगवानगडावरील प्रधानाचार्य ह.भ.प.श्री. नारायण महाराज शास्त्री (स्वामीजी) यांनीही बाबांच्या शेजारी बसून घोगस पारगावकरांनी मोठ्या प्रेमाने बनवलेल्या प्रसादाचा आस्वाद घेतला. जेव्हा ऐश्वर्यसंपन्न भगवानगडाचे महंत पुढारलेल्या जमान्यात देखील आपली संस्कृती आणि वारसा समर्थपणे सांभाळतात तेव्हा साहजिकच मस्तक झुकल्या शिवाय राहत नाही. श्री संत भगवानबाबांनी नारायणगडाची १४ वर्षे यशस्वीपणे गादी सांभाळली



परंतु तरीही ईश्वराची इच्छा झाली आणि श्री क्षेत्र भगवानगडाची निर्मिती झाली. भगवानगडाच्या स्थापनेपासून ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबांनी पारमार्थिक ऐश्वर्याबरोबर भौतिक ऐश्वर्याची पताका फडकावली, ऐश्वर्यसंपन्न असुन देखील जसा ज्याचा भाव तसा त्याचा देव याप्रमाणे ते अनुकरण करत होते. साध्याला साधे तर श्रीमंताबरोबर आपल्या दुहेरी श्रीमंतीचे दर्शन घडवून देत होते. घोडा टांग्याचा प्रवास देखील सुखकर व्हावा यासाठी टांग्याच्या चाकांनाही जिप गाडीचे चाके वापरण्याची संकल्पना ही श्री संत भगवान बाबांच्या ऐश्वर्यशाली जीवनशैलीची एक साक्ष ठरते. घोड्याचा टांगा, पांढरे शुभ्र वस्त्र ,केशरी फेटा, कपाळी गोपिचंद-अष्टगंधाचे हे तेजस्वी वैभव होते, मात्र एवढे वैभव असले तरी आपण साधेपणा देखील सोडला नसल्याचे ते दाखवून देत होते. राजवैभवात गडाचा हा राजा आपले धर्मकार्याचे रत्नजडीत सिंहासनावरून धर्मध्वजा फडकवत होता. त्यांचे पश्चात द्वितीय महंत संत भिमसिंह महाराज यांनीदेखील या वैभवात भर घालून गडाची धूरा, संस्कृती व वारसा चालवण्याचे काम करत गडाचा नावलौकिक दूरवर नेला. गुरुवर्य भिमसिह बाबांनी देखील ऐश्वर्याबरोबर संस्कृती व परंपरा अबाधीत ठेवली. आता तर ज्ञान आणि विज्ञान सोबतीला घेऊन या गडाची संस्कृती व परंपरा सातासमुद्रापार नेण्याचे काम विद्यमान महंत न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबा हे करत आहेत. अवघड तत्वज्ञान सोप्या भाषेत सांगत ग्रंथराज ज्ञानेश्वरीमय जीवन समाजाप्रती समर्पित केले आहे. भगवानगडाच्या वैभवा बरोबरच गडाचा साधेपणा देखील त्यांच्याकडून अनुभवास येत आहे. श्री क्षेत्र भगवानगडाच्या नारळी साप्ताहात शिंगोरी आमटी बनवण्यासाठी संपूर्ण शिंगोरीचे ग्रामस्थ आवर्जून उपस्थित असतात.

# बीड लोकसभा निवडणुकीसाठी भाजपा महायुतीच्या उमेदवार म्हणून उमेदवारी बुधवारी पंकजा मुंडे यांनी चार उमेदवारी अर्ज दाखल केले.

**बीड (प्रतिनिधीदि.**

बीड लोकसभा निवडणुकीसाठी भाजपा महायुतीच्या उमेदवार म्हणून उमेदवारी बुधवारी पंकजा मुंडे यांनी चार उमेदवारी अर्ज दाखल केले. यानंतर शहरातून फेरी काढण्यात आली. सायंकाळी झालेल्या सभेत पंकजा मुंडे यांनी असे आवाहन केले




'मला पैसे कामवायचे नाहीत, नावाची, प्रसिद्धीची लालसा नाही. एक काटा माझ्या मनात रुतलेला आहे. गोपीनाथ मुंडेंचे स्वप्न माझ्या डोळ्यात आहेत. ते पूर्ण करण्याची अशी संधी पुन्हा येणार नाही. दहा वर्षांपूर्वी मला गोपीनाथ मुंडेंना हार घालायचा होता, अंत्यसंस्कार करावा लागला. ती सल दूर करण्यासाठी ही शेवटची संधी मला द्या.', असे भावनिक आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा बीड लोकसभा मतदारसंघातील भाजपाच्या उमेदवार पंकजा मुंडेंनी केले. यावेळी बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे, उमेदवार पंकजा मुंडे, खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांच्यासह आमदार सुरेश धस, आम नमिता मुंदडा, आमदार लक्ष्मण पवार, आमदार प्रकाश सोळंके, आमदार बाळासाहेब आजबे, अमरसिंह पंडित, रमेश आडसकरआदींची उपस्थिती होती. पंकजा मुंडे म्हणाल्या, 'या जिल्ह्याला कारस्थानाची सवय आहे. कोणी कारस्थाने करू नका. आपल्या विकासावर कोणतेही काळेढग येऊ देऊ नका . मी पराभव पचवलाय . हा पराभव माझा नव्हता तर जनतेचा होता. त्यामुळे माझी प्रत्येकावर बारीक नजर आहे. आता मी पदर पसरून म्हणतेय, एक काटा माझ्या मनात रुतलेला आहे. दहा वर्षांपूर्वी चार तारखेला मला गोपीनाथ मुंडेंना हार घालायचा होता, अंत्यसंस्कार करावा लागला. ती सल दूर करण्यासाठी ही शेवटची संधी मला द्या गोपीनाथ मुंडेंचे स्वप्न माझ्या डोळ्यात आहेत. ते पूर्ण करण्याची अशी संधी पुन्हा येणार नाही. मला माझ्यासाठी नाही, तर जनतेसाठी पद हवे आहे.' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान दिले. त्यांनी संविधानातून हक्क दिले. संविधान बदलण्याचा अधिकार जगात कोणालाच नाही. जर कोणी संविधानाला नख लावायचा प्रयत्न केला तर आपण तुमच्या आधी रस्त्यावर उतरू, असा इशाराही पंकजा मुंडे यांनी या आधीच्या भाषणातून दिलेला आहे.

# निवडणूक काळात मराठा तरुणांवर तडीपारची कारवाई करणे निंदनीय व चुकीचे

## निवडणूक आयोगाकडे दाद मागणार - बजरंग सोनवणे

**वादळवार्ता/बीड**

मराठा चळवळीमध्ये काम करणाऱ्या ज्या एका समूहाच्या तरुणांवर त्यांचे कोणतेही गुन्हेगारीचे रेकॉर्ड नसताना तडीपारची कारवाई केली जाते. हे निंदनीय व चुकीचे असून निवडणुक काळात अशा प्रकारची यापुढे कारवाई करू नये, जी कारवाई केली, ती थांबविली पाहिजे. या संदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार करून दाद मागणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी बाभळगाव घाट (ता. माजलगाव) येथे प्रचारादरम्यान बोलताना दिली.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे प्रचारासाठी माजलगाव तालुक्यात फिरत आहेत. तालुक्यातील बाभळगाव घाट येथे बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मराठा समाजाच्या २७ तरुणांवर त्यांनी मराठा आंदोलनात सहभाग घेतला. म्हणून जिल्हा प्रशासनाने तडीपारची कारवाई केली आहे. शासनाने आकस बुद्धीने आणि मराठा समाजाविषयी आकस म्हणून त्यांच्यावर तडीपारची कारवाई केलेली आहे. असा आरोप करीत निवडणुकीत दहशतीचे वातावरण करणे, या गोरगरीब तरुणांच्या घरावर दबाव देणे ही राजनीती तर नाही ना ? असा संशय व्यक्त करीत हे कोण करतंय, का करायला लावतंय असे प्रश्न उपस्थित केले. महाराष्ट्रात असे हजारो लोक आहेत, की ज्यांच्यावर अनेक गुन्हे असताना त्यांच्यावर तडीपारची कारवाई होत नाही. आमच्या या तरुणांवर का कारवाई केली जाते. यांच्यावर कोण दबाव टाकतय याची तक्रार निवडणूक आयोगाकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचा उमेदवार म्हणून करणार असून दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर कारवाई झालेल्या तरुणांच्या पाठीशी उभा असून प्रसंगी वेळ पडली तर न्यायालयात देखील जाऊ अशी ग्वाही ही बजरंग सोनवणे यांनी दिली.

# राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले याच्या विंठबनेच्या निषेधार्थ सकल ओ बी सी समाजाच्या वतिन माजलगावात तहसिलदार यांना निवेदन




**माजलगाव**

राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतुळयावर शाही फेकुन दिनांक २३एप्रिल २०२४ रोजी विठंबना केल्याची घटना यवतमाळ येथिल महात्मा चौक येथे घडली फुले या घटनेच्या निषेधार्थ विठंबना करणा-या नराधमावर शासना मार्फत कठोर कार्यवाही करण्यात यावी या साठी माजलगाव तहसिल तहसिलदार मनाळे मॅडम यांना सकल ओबीसी समाजाच्या वतिन निवेदन देण्यात आले या प्रसंगी ज्ञानेश्वर नाना मेंडके,ग्यानबा सरवदे, अमोलउपस्थित एकता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे,ग्यानबा सरवदे, अमोल जाधव,शंकर गावडे, अविनाश कांडुरे,डॉ भागवत साळवे,दत्ता आबुज ,पवन कोरडे, नितिन कोरडे जिवन कोरडे ,रामभाऊ गिरगुणे, ज्ञानेश्वर गिरगुणे,भिमराव हिवाळे व ओबीसी कार्यकर्ते उपस्थित होते

# अंमळनेर परिसरातील घराघरातील मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने ८ जुनला नारायणगडावर यावे -मनोज जरांगे

## कोणत्याच पक्षाच्या प्रचाराला न जाण्याचे केले आवाहन

**वादळवार्ता/पिंपळवंडी**

लोकसभा निवडणुकीत कोणाला मतदान करा हे सांगणार नाही, परंतु ज्याला पाडायचे त्याला ईतके ताकतीने पाडा की त्यांच्या पाच पिढ्या निवडणुक लढणार नाहीत ईतक्या मताने पाडा असे अवाहन करीत विधानसभेला राज्यात ९२ मतदार संघावर मराठा समाजाचे प्राबल्य असल्याने विधानसभा निवडणुकीत संपुर्ण ताकतीने उतरणार असल्याची घोषणा मराठायोद्धा मनोजदादा जरांगे यांनी करीत ८ जुन रोजी नारायणगड येथे होणार्या विशाल सभेला अंमळनेर परिसरातील घराघरातील मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे अवाहन केले. पुणे येथून धामणगाव - अंमळनेर मार्गे बीडला जात असताना गावोगावी त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले . अंमळनेर येथे छोटेखानी स्वागताला मोठे स्वरूप येत मोठ्या संख्येने समाजबांधव एकवटला होता. गावात येताच ढोलताशांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. वाजत गाजत त्यांची मिरवणूक काढण्यात आली. स्वागतसभारंभानंतर छोटेखानी कार्यक्रमात त्यांनी समाजबांधवांना संबोधित केले ते म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळत नव्हते त्यामुळे समाजाची मुले नौकरी, शिक्षणापासून वंचित राहत होती, आता कुणबी नोंदी सापडल्याने मराठा समाजाला आरक्षण मिळत आहे. सगेसोयरे यांची मागणी बाकी आहे ती देखील मागणी पुर्ण करण्यासाठी माझ्या जिवाची बाजी लावीत आहे, आणि हे मिळाल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, भले यासाठी माझा जीव गेला तरी बेहत्तर



असे सांगत मराठा समाजाने एकत्र येणे काळाजी गरज आहे. झालेली एकजुट फुटु देऊ नका, लोकसभा निवडणुकीत कोणत्याच पक्षाच्या प्रचाराला जाऊ नका, कोणाला मतदान करा हे सांगणार नाही परंतु ज्याला पाडायचेय त्याला ईतक्या मताने पाडा की, त्यांच्या पाच पिढ्या निवडणुकीत कोणी उभा राहीले नाही पाहिजे. पाडण्यात देखिल मोठा विजय असतो असे सांगितले. या प्रसंगी मोठ्या संख्येने मराठा समाज उपस्थित होता.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )